**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळ, छत्रपती संभाजीनगर**
Email: chair.aurboard@mahedu.gov.in/sschscboardabad@gmail.com
Tel: Div.Chairman(P) : (0240)-2331116 EPABX -2334228/2334284. Div. Secretary (P) :2341035

जाक्रछसंविमं/लेखा/ 3053
दि.16/10/2026

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा व
कनिष्ठ महाविदयालये,
छत्रपती संभाजीनगर/बीड/जालना/परभणी/हिंगोली.

विषय- दुष्काळग्रस्त भागातील विदयार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणेबाबत...
संदर्भ-१. क्र.रा.मं/परीक्ष-३/३४५४ दि.१३/०८/२०२६ चे पत्र.
२. क्र.रा.मं/परीक्ष-३/३५०७ दि.१८/०८/२०२६ चे पत्र.
३.मदत व पुनर्वसन विभाग,मंत्रालय, यांचा शासन निर्णय क्रमांक समिती २०२६/प्र.क्र/८२/मदत-२, दिनांक २५/०९/२०२६.
४.क्र.रामं/लेखा/दुष्काळग्रस्त फीस माफी/२६-२७/४०४४ दि.२९/०९/२०२६

उपरोक्त संदर्भीय पत्र अन्वये फेब्रु/मार्च २०२७ मधील महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांन्त इ.१० वी व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ.१२ वी परीक्षेस प्रविष्ट होवू इच्छिणाऱ्या विदयार्थ्यांची परीक्षांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरुन घेण्याबाबत सविस्तर सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

तथापी, शासन निर्णय दि.२५/०९/२०२६ अन्वये महाराष्ट्र राज्यातील २६५ व तदनंतर ४० असे एकुण ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे राज्य शासनाने ३०५ तालुक्यांमध्ये विशेष बाब म्हणून उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामध्ये शालेय/महाविदयालयीन विदयार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी देण्याबाबत नमूद केलेले आहे.

त्यास अनुसरुन शासन निर्णयानुसार फेब्रु/मार्च २०२७ मध्ये आयोजित इ.१० वी इ. १२वी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विदयार्थ्यांकडून पुढील आदेश येईपर्यंत परीक्षा शुल्क न घेता आवेदनपत्रे भरुन घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.तसेच याबाबत कोणतीही तक्रार या कार्यालयाकडे येणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबत राज्य मंडळामार्फत पुढील सविस्तर सुचना यथाशिघ्र निर्गमित करण्यात येतील.

**मा.वि. अध्यक्ष यांच्या मान्यतेने.**

(आर.बी.वाणी)
**विभागीय सचिव**
**छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळ,**
**छत्रपती संभाजीनगर**